दै. गोदातीर दि. ०४/०७/२०२५-

# महाराष्ट्र शासनाची अन्न धान्य योजना भासवून जवळपास चौदाशेहून अधिक नागरिकांना पावणे दोन कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या आरोपीसह दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)-** छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था धार संचलित महाराष्ट्र राज्य अन्नदाता सेवा केंद्र ही संस्था राज्य शासनाची आहे, असे भासवून जवळपास चौदाशेहून अधिक गोरगरीब लोकांची १ कोटी ८५ लाख ३७ हजार ७५४ फसवणूक करणारा मुख्य सूत्रधार बाबासाहेब सुतारे आणि एका महिलेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. विशेष म्हणजे बाबासाहेब सुतारे याला पकडण्यासाठी जिल्हा पोलीस विभागाने एक लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर केले होते. ते पारितोषिक पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमला विभागून देण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.

शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्यात अनिल गुणाजी पाईकराव (वय ३४) या दुचाकी मेकॅनिकने आपली वरील संस्थेत फसवणूक झाल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले होते. यातील आरोपी बाबासाहेब शंकर सुतारे (वय ३९ राहणार धार, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली) त्याच्याकडे पीआरओ म्हणून काम करणारी सोनाली विजयराव बाजड (वय २९ राहणार तालुका औंढा नागनाथ) यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या आरोपींनी संगनमत करत कट रचून छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था धार संचलित महाराष्ट्र राज्य सेवा केंद्र ही संस्था महाराष्ट्र शासनाच्यावतीने चालविण्यात येत असून महाराष्ट्र शासन गोरगरीब लोकांना माफक दरामध्ये अन्नधान्य वाटप करणार असल्याचे सांगितले. केवळ ११०० रुपयां मध्ये ३० किलो गहू, २५ किलो तांदूळ, १० किलो साखर, १० किलो पोहा, ५ किलो शेंगदाणे उर्वरित २० किलो गहू तसेच १२०० रुपयांमध्ये ६० किलो गहू, २५ किलो तांदूळ वाटप करण्यात येत आहेत. या सोबतच ज्या कामगारांनी ३० हजार रुपये भरले तर त्यांना इलेक्ट्रिक स्कुटी, २२०० रुपये भरणाऱ्याला शिलाई मशीन व सायकल, लॅपटॉप तसेच १२०० रुपये भरल्यानंतर विधवा महिलांसाठी एक वर्षासाठी प्रतिमा १० हजार रुपये विधवा पेन्शन योजना दिली जाईल, असे आमिष दाखविले. तसेच विविध माध्यमातून खोटा प्रचार व प्रसार करून अनिल पाईकराव आणि इतर लोकांना त्यांच्या संस्थेत काम करणाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत संस्थेला पैसे भरलेल्या लाभार्थ्यांना ठेव म्हणून जमा केलेल्या रकमेच्या बदल्यात परतफेड म्हणून धान्य व इतर साहित्य वाटप करण्यास नकार दिला. संस्थेकडे विश्वासाने सोपविलेल्या रकमेचा अपहार करून लाभार्थ्यांची १ कोटी ८५ लाख ३७ हजार ७५४ रुपयांपेक्षा अधिक रकमेची फसवणूक केली. यातील आरोपी फरार होते. त्यापैकी महिला आरोपी माया गौतम खिल्लारे ही २४ जून २०२५ रोजी आर्थिक गुन्हे शाखेतून अटक करण्यात आली असून ती सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. तर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी आपल्या पथकासह बाबासाहेब शंकर सुतारे व सोनाली बाजड या दोघांना अटक केली. सदर गुन्ह्यामध्ये एकूण १३ आरोपी होते. यापूर्वी चार आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. सहा आरोपींची अटकपूर्व जामीन झालेली आहे. त्यातील एक आरोपी मयत झाला असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मुख्य आरोपी असलेला बाबासाहेब सुतारे याच्यावरती एक लाख रुपयाचे बक्षीस ठेवण्यात आले होते त्याला व एका महिलेला लातूर येथून पकडण्यात आलेल्या पथकाला हे पारितोषिक देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.